RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ६, अंक - ४ ] मंगळवार, एप्रिल १८, २०१७ / चैत्र २८, शके १९३९ [ पृष्ठे २

## असाधारण क्रमांक ४

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

जिल्हा पुणे

*(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६, पोट-कलम (४) सह भूमी संपादन अधिनियम-भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९ खाली जिल्हाधिकारी यांनी जारी करावयाची अधिसूचना)*

*अधिसूचना*

क्रमांक पीएलबी-२/काvि-०२/२०१७.--ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या अधिनियमातील कलम १५१, पोट-कलम *(२)* खाली काढलेली अधिसूचना क्र. टीपीएस/२१७५/५१०६ यूडी-७, दिनांक ३ मार्च १९७९ अन्वये उक्त अधिनियमाखालील शासनाने प्रसिद्ध केलेल्या विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जमिनीच्या संपादनाबाबतच्या उक्त अधिनियमाच्या कलम १२६, पोट-कलम *(१) (२)* व *(४)* खालील राज्य शासनाने वापरावयाच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांना सोपविण्यात आलेल्या आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ च्या महाराष्ट्र ३७) (यापुढे उक्त महाराष्ट्र अधिनियम म्हणून संबोधिलेला) च्या कलम ३१ अन्वये पुणे महानगरपालिकेची विकास योजना क्र. टीपीएस १८८४/१३७७/सीआर-२२०/८४/III/यूडी-७, दिनांक ५ जानेवारी १९८७ ला मंजूर झाली असून ती शासन राजपत्रात दिनांक २९ जानेवारी १९८७ रोजी प्रसिद्ध झालेली आहे.

आणि ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेने (नियोजन प्राधिकरण असल्याने) यापुढे उक्त महानगरपालिका म्हणून संबोधिलेली) उक्त महाराष्ट्र अधिनियम कलम १२६, पोट-कलम *(१)* अन्वये उक्त जमीन ३० मी. डी. पी. रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे उक्त सार्वजनिक प्रयोजन म्हणून संबोधिलेली) संपादन करण्याबाबत शासनाकडे अर्ज केलेला आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने सन २०१५ मधील अध्यादेश क्रमांक १७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत विकास योजनेतील आरक्षणाच्या जमिनीचे संपादन करताना भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम ४ ते १५ ला सूट दिली आहे. सदरचा अध्यादेश महाराष्ट्र शासन राजपत्रात २९ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध झालेला आहे आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे सरळ याद्वारे घोषित करण्यांत येत आहे.

आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या व विकास योजनेत ३० मी. डी. पी. रस्त्यासाठी आरक्षित केलेल्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीनमध्ये नमूद केलेल्या पत्रानुसार संपादन संस्थेने म्हणजेच पुणे महानगरपालिकेने बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून शासनाच्या प्रशासकाने निर्धारित केलेले क्षेत्र किंवा इतर अटीबाबत कोणी मागणी केल्यास त्यांच्या मागण्या संपादन संस्थेकडे हस्तांतरित करून त्याप्रमाणे पुढील निवाड्यामध्ये विनिर्दिष्ट केल्या जातील.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये

जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी विशेष भूमी संपादन अधिकारी क्रमांक १५, पुणे मनपा, क्षेत्रीय कार्यालय इमारत, तिसरा मजला, स्टेट बँक ऑफ इंडियाचे वर, टिळक रस्ता, पुणे-४११ ००२ यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक

### संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

### जिल्हा पुणे, तालुका हवेली, गाव मौजे हिंगणे बुद्रुक

| अनु-क्रमांक | भूमापन क्रमांक किवा गट नंबर | संयुक्त मोजणी नकाशातील विवरणपत्रानुसारचे क्षेत्र (चौ. मी.) | सार्वजनिक रस्त्याखालील क्षेत्र (ताब्यात असलेले क्षेत्र) (चौ. मी.) | भूसंपादनाखालील क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ४३/४ पैकी ते ४३/२५ पैकी | १५५१८ | ६८८७ | १७३०७ |
| २ | ४४ पैकी | ८६७६ | | |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** म्हात्रे पूल ते राजाराम पूल नदीकाठचा ३० मी. डी. पी. रस्ता.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन :** ३० मी. डी. पी. रस्ता भूसंपादन

**समाजाला होणारे लाभ :** पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा (आर्थिक, रोजगार, पायाभूत सुविधा, सोयी-सुविधा याबाबत व इतर लाभांसंबंधात).

**प्रकल्पाखालील जागेची सद्य:स्थिती :** जागेवर कोणतीही बांधकामे नाहीत. जागा पूर्ण मोकळी असून आज रोजी सदरचा रस्ता जागेवर पूर्ण होऊन पूर्णक्षमतेने वापरात आहे.

## अनुसूची - तीन

### पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन-गावाचे नाव : हिंगणे बुद्रुक, तालुका हवेली, जिल्हा पुणे

| अनु-क्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ (हेक्टरमध्ये) |
| निरंक | निरंक | निरंक |

## अनुसूची - चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

निरंक

**टीप.--**उक्त जमिनींच्या नकाशाचे भूमी संपादन अधिकारी क्रमांक १५, पुणे मनपा, क्षेत्रीय कार्यालय इमारत, तिसरा मजला, स्टेट बँक ऑफ इंडियाचे वर, टिळक रस्ता, पुणे-४११ ००२ या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

सौरभ राव,
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, १८ एप्रिल २०१७.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI NARESH MAHADEORAO GOTE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006. EDITOR : SHRI NARESH MAHADEORAO GOTE.

**भूमि संपादन अधिनियम २०१३ कलम २१**
**पोटकलम १ व २ अन्वये प्रसिध्द करावयाचे**

## प्रकटपत्र

यावरुन जाहीररीत्या जाणीव देण्यात येत आहे की, सन २०१३ च्या भूमिसंपादन अधिनियमान्वये दिनांक १८/०४/२०१७ चे महाराष्ट्र सरकारचे राजपत्र भाग १, पुणे विभाग (पुरवणी ) **पृष्ठ क्रमांक १ व २** या वर प्रसिध्द झालेला **दि. १८/०४/२०१७** चा मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचा **जाहीरनामा क्रमांक पीएलबी-२/कावि/०२/२०१७** यात सदरहू ॲक्टचे कलम १९ अन्वये **मौजे हिंगणे** गावात किंवा गावाजवळअसलेल्या जमिनीपैकी खाली दर्शविलेल्या चतु:सीमा असलेली व नुकतीच निशाणी केलेली त्याजवर असलेली इमारत, झाडेझुडपे वगैरे सह सुमारे खाली दर्शविल्याप्रमाणे कमी किंवा अधिक भरणारी जागा सरकारकडून लवकरच **'३० मी.डी.पी रस्ता '**ह्या सार्वजनिक कारणासाठी ताब्यात घेण्यात येणार आहे.

तरी सदरहू जमिनीत हितसंबंध असलेल्या सर्व इसमांस यावरुन फर्मविण्यात येते की, त्यांनी महानगरपालिका क्षेत्रिय कार्यालय इमारत, टिळक रोड, पुणे येथे विशेष भुमी संपादन अधिकारी क्र. १५ , पुणे यांच्या कचेरीत, **दि१५/०५/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता** जातीने अगर योग्य त्या मुखत्यारामार्फत हजर राहून सदरहू जमिनीतील आपआपल्या हितसंबंधाचा प्रकार, त्यासंबंधी मिळावयाच्या मोबदल्याच्या रकमेचा तपशील व सदरहू ॲक्टचे कलम २० अन्वये केलेल्या जागेच्या मोजणीसंबंधी काही हरकती असल्यास त्यांची संपुर्ण तपशील वार माहिती द्यावी. चुकू नये.

## परिशिष्ट

जिल्हा - पुणे, तालुका - हवेली, गाव - हिंगणे बुद्रुक

| अ क्र | भूमापन क्र. किंवा गट क्रमांक | संयुक्त मोजणी नकाशातील विवरण पत्रा नूसार क्षेत्र (चौ.मी.) | सार्वजनिक रस्त्याखालील क्षेत्र (ताब्यात असलेले क्षेत्र) (चौ.मी.) | भूसंपादना खालील क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उत्तर | पुर्व | दक्षिण | पश्चिम |
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | ४३/४ पैकी ते ४३/२५ पैकी | १५५१८ | ६८८७ | १७३०७ | ४५ भाग | ४७ भाग | गावठाण | सडक |
| २ | ४४ पैकी | ८६७६ | | | | | | |

ज्यासाठी जमीन संपादन करावयाची आहे ते प्रयोजन, - **' म्हात्रे पूल ते राजाराम पूल नदीकाठचा ३० मी.डी.पी.रस्ता.'**

जा. क्र. एलए - १२/जाहिर प्रकट/कलम २१/३७१
दि. २६/०४/२०१७
मनपा क्षेत्रीय कार्यालय इमारत
टिळक रोड, तिसरा मजला,
स्टेट बँक ऑफ इंडियाचेवर पुणे-२

(शा.ह.मुंढे-जाधवर)
विशेष भूमि संपादन अधिकारी
क्र.१५,पुणे.

C:\Documents and Settings\admin\Desktop\RATAN\Kalam 9(1)(2)\kalam 9(1)(2).doc